## काव्यकुंज

## तांडा

तांडा चालला , चालला घोडीवर
वाट सुचेना दिसेना मोडीवर।। धृ ।।

आई वझ्यानं घाम पुस पदरानं
पायी पायतान तुटलं पुढून मागुन
टाके पडावं शेताच्या बांधावर,
उभा संसार उसाच्या तोडीवर ... वाट सुचेना ....

गेलं बापूस शिकारी रानावर
चूल पेटली गबाळ-धोंडयावर
सारं थकलं पेंगलं चूली म्होरं,
माय रांधते, लेकरु मांडीवर ... वाट सुचेना ....

रात सरली सूर्य पहाडा आड
पक्षी उडाले, सुनेसुने ताडमाड
घरटं राहयलं उदास तानी पोर,
दिवस कामानं सुचेना घडीभर ... वाट सुचेना ....

नाही गांव, नाही आम्हा घरदार
नाही शाळा, नाही कुणी सरदार
सवलत योजना देती भली सरकारं
भात बिरबली शिजेना हांडीवर.... वाट सुचेना

**राजेश अंबादास पवार**
पारस औ.वि.केंद्र





## कातर

उचलून पुन्हा उन्हाचा हा सांगाडा
हा मित्र इथे का थांबत नाही थोडा

पसरुन दिशांच्या लांब लांब सावल्या
आकाश कुणा दाखवी गूढ वाकुल्या

ते रंग तरंगावरी कसे पसरती
जणू जातो विझूनी जाळ पाहता सती

आकाश जणू पोरके पुन्हा झालेले
चांदणे उशाशी फिरुनी आज निजलेले

गगनात गळावी गात्रांची वल्कले
चांदणे फांदीवर टपून बघ सरसरले

या वेशीवरती स्मृतीकोळयांची जाळी
जो जळतो त्याच्यावर विझण्याची पाळी

चाललो किती हे कळले मजला नाही
वाळून कोळ अंगातील तांबडी शाई

**महेश आफळे**
जनसंपर्क अधिकारी